**<u>विटा येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात</u>**

**<u>ता.खानापूर, जिल्हा–सांगली</u>**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८३/२०२५.**

**स्नेहल अनिकेत पाटील ........... अर्जदार**

**विरुध्द**

**अनिकेत भगवान पाटील ........... जाबदार**

**<u>निशाणी ०५ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा, कलम २३ अन्वये जाबदार कडून अर्जदार क्र.१ व २ यांना एकत्रीत दरमहा रक्कम रु.१७,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**<u>अर्जदारा यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –</u>**

२. दि.०२/०६/२०२२ रोजी जयमातादी, मंगल कार्यालय, विटा, ता खानापूर, जि. सांगली येथे हिंदू धर्म शास्त्र समाजाचे रिती रिवाजाप्रमाणे जाबदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांचा प्रेमविवाह पार पडलेला आहे. अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेकडे विवाहानंतर नांदणेस गेल्यानंतर अर्जदार हिस जाबदार यांनी काही दिवस व्यवस्थित नांदविले. तदनंतर जाबदार क्र.२ हिने अर्जदार हिस लग्नामध्ये मानपान केला नाही, हुंडा दिला नाही म्हणून सतत पै–पाहुण्यांसमोर टोमणे मारत व कोणत्याही कारणावरून भांडण करत असत. जाबदार क्र.२ या अर्जदार हिस वारंवार "तु मला पसंत नाही, माझ्या मुलाकडे बघून मी सून मानले आहे नाहीतर मी दुसरी मुलीशी लग्न लावून देणार होती. तु आल्या आल्या घरात आग लावलीस" असे वारंवार म्हणत असे. सदर बाब जाबदार क्र.१ यांस अर्जदार यांनी सांगितले असता, जाबदार क्र.१ हा "तु गप्प रहा, माझी आई कधीच खोटे बोलत नाही, तुझेच चुकत असेल" असे म्हणून अर्जदार हिस घालून पाडून बोलत

असे. अर्जदार या जाबदार यांचेकडून होणारा सर्व त्रास सहन करून आज ना उद्या संसार सुखाचा होईल या आशेने संसार करीत होत्या.

३. तदनंतर जाबदार क्र.१ व अर्जदार हे नेर्कल, हैद्राबाद येथे व्यवसायाकरीता गेलेनंतर काही दिवसातच अर्जदार यांना जाबदार क्र.१ यांस दारूचे व्यसन असलेचे समजून आल्यामुळे अर्जदार यांना जबर मानसिक धक्का बसला होता. त्यावेळी अर्जदार यांनी जाबदार क्र.१ यांचेकडे त्यांचे व्यसनाबाबत विचारणा केली असता, त्यांनी अर्जदार यांना दारू पिवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जबर मारहान केली व "तु कोण मला विचारणारी, मी माझ्या मनाचा राजा आहे, तुला काय करायचे ते कर मी दारू सोडणार नाही" अशी भाषा केली. त्यामुळे अर्जदार यांना जाबदार क्र.१ यांचे अशा वागण्याचा किळस वाटू लागला. अर्जदार गरोदर असताना जाबदार क्र.१ हे अर्जदार यांना घेवून जाबदारचे मुळ गावी मौजे लिंब येथे आले. जाबदार हे अर्जदार यांना दवाखान्यात घेवून जात नव्हते व औषध उपचार करीत नव्हते, त्यामुळे अर्जदार यांना दवाखान्यात जाणेकरीता माहेरच्या लोकांचा आधार घ्यावा लागत होता. दवाखान्यात जाणेचे कारणावरून जाबदार हे अर्जदार यांना धमकावत, भांडण काढत होते. असा सर्व त्रास गरोदरपणामध्ये अर्जदार सहन करीत असताना मार्च २०२३ मध्ये जाबदार क्र.१ यांनी विनाकारण जाबदार क्र.२ व ३ यांचे सांगणेवरुन मारहाण केली व अर्जदार यांचे गळयातील मंगळसुत्र स्वतःच्या हाताने तोडून दिले. तसेच अर्जदार यांना, "जातेस तर जा, मला तुझी गरज नाही, तुझ्या सारख्या छप्पन्न पोरी आणू अशी भाषा वापरून दि.०३/०४/२०२३ रोजी अर्जदार यांना जेवणातून मुंगी मारण्याचा खडू खायला घालून वरून पाणी पाजले व नंतर मुद्दामहून खोटा कांगावा चालू केला की अर्जदार यांनी स्वत:च खडू खाल्ला आहे.

४. तदनंतर अर्जदार व जाबदार क्र.१ यांस दि.१९/०९/२०२३ रोजी अर्जदार नं.२ चि. श्लोक हा मुलगा झालेला आहे. सदर बाळंतपणाचा खर्च देखील अर्जदार यांचे आई वडीलांनी केलेला होता. जाबदार क्र.१ व ३ हे रोज दारू पिवून येवून भांडण काढत व भांडणाचा सर्व राग लहान मुलांवर काढत असत. जाबदार क्र.१ व ३ हे

अर्जदार यांचेवर संशय घेवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जाबदार क्र.३ हे जाबदार क्र.१ यांचे समक्ष अर्जदार यांना मारहाण करीत असत. एप्रिल २०२३ मध्ये अर्जदार क्र. २ श्लोक हा खेळताना हातावर पडून हाताला फ्रॅक्चर झाले असावे या कारणासाठी अर्जदार क्र.१ या कु.श्लोक यास दवाखान्यात घेवून जात असताना जाबदार क्र.२ ही गल्लीमध्ये ओरडू लागल्या की, "तुच माझ्या नातवाचा हात मोडला, तुझ्या कर्माची फळे त्याच्या वाटयाला आली आहेत" अशी भाषा केली. तसेच जाबदार क्र.१ हे नेहमीच घरात दारू पिऊन येवून दंगा करून अर्जदार क्र.१ व २ यांना रात्री अपरात्री मारहाण करून अर्जदार क्र.१ व २ यांना माहेरी पाठवून देणेच्या उद्देशाने घराबाहेर काढत असत. जाबदार क्र.१ हे अर्जदार यांचेशी वाद करून दारूचे व्यसनाकरीता वारंवार पैशाची मागणी करत. तसेच अर्जदार नं.२ यांचे आरोग्याकडे देखील लक्ष देत नव्हते.

५. तदनंतर दि.०६/०७/२०२४ रोजी जाबदार क्र.२ या अर्जदार यांचेवर त्यांच्या कपाटातील जोडव्या चोरल्या असा खोटा आळ घेतला. दि.१३/०७/२०२४ रोजी घरामध्ये किराणा सामान आणणेकरीता अर्जदार यांच्या आई वडीलांकडून जाबदार क्र.१ यांनी दहा हजार रूपये घेतले. जाबदार क्र.१ हे घरी जेवत नसले की, जाबदार क्र. २ म्हणत असे की, "जा सारसा घालतोय का बघ, नाहीतर तिकडेच जा" असे म्हणत. श्लोक याला बारश्याला केलेली सोन्याची चैन देखील जाबदार क्र.१ यांनी त्यांचे व्यसनासाठी मोडली होती. तसेच बारश्याला श्लोक यास आलेले दागिणे देखील कपाटातून चोरीला गेले. त्यावेळी अर्जदार क्र.१ हिने जाबदार क्र.१ यांचेकडे विचारणा केली असता अर्जदाराला काठीने व लाथा बुक्यांनी जबर मारहाण केली. अशा प्रकारे जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार यांचा शारिरीक व मानसिक छळ केला आहे.

६. जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना दि.१३/०६/२०२४ रोजी रू.५,००,०००/– हुंडा घेवून ये असे सांगून अंगावरील नेसत्या वस्त्रानिशी मुलगा श्लोक यांचेसह घरातून हाकलून दिले. त्यावेळी अर्जदार या त्यांचे माहेरी आई वडीलांकडे राहणेस आल्या. तेव्हापासून जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांचे अन्न, वस्त्र, निवारा, कपडेलत्ता यांची कोणतीही विचारपूस केली

नाही.

७. जाबदार क्र.१ ते ३ यांचे मौजे लिंब, ता तासगांव, जि. सांगली येथे स्वत:चे घर आहे. तसेच जाबदार क्र.१ व ३ यांचा गलाई व्यवसाय असून त्यापासून दरमहा १० ते २० लाख रूपये इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदारांची मौजे लिंब येथे बागायती जमीन मिळकत असून त्यामधून त्यांना वार्षीक ७ ते ८ लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचे घरी म्हैशी असून अशा दुभत्या जनावरांपासून दरमहा र.रू.३० हजार रूपये इतके उत्पन्न मिळते. जाबदार क्र.१ यांची प्रकृत्ती धडधाकट असून त्यांना कोणताही आजार नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली व सधन आहे.

८. अर्जदार दि.१३/०६/२०२४ पासून तिचे आईकडे आश्रितासारखे जीवन जगत आहे. अर्जदार क्र.१ हिला जाबदार यांनी केलेल्या मारहाणीमुळे व दिलेल्या शारिरिक, मानसिक त्रासामुळे कोणताही कामधंदा होत नाही. अर्जदार ही स्वत:चा चरितार्थ चालविणेस असमर्थ आहे. तरी अर्जदार क्र.१ यांना अन्न, वस्त्र, निवारा, व इतर मुलभूत गरजा याकरिता म्हणून दरमहा र.रु. १०,०००/– पोटगी दाखल जाबदार क्र.१ यांचेकडून मिळावे. तसेच अर्जदार नं.२ यांना त्यांचे जेवण–खान, कपडा लत्ता, उदनिर्वाह व वैद्यकिय खर्चासाठी प्रत्येकी र.रू.७,०००/– दरमहा मिळावेत. अर्जदार क्र.१ व २ यांना राहणेसाठी घरभाडे म्हणून दरमहा ५,०००/–मिळावेत. अर्जदार क्र.१ व २ यांना एक रक्कमी नुकसान भरपाईची रक्कम म्हणून र.रू.१०,००,०००/– मिळावेत. अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

९. जाबदार क्र.२ व ३ यांना नोटीस बजावणी होवून देखील अर्जाचे कामी हजर झाले नाहीत त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविणेत आला व जाबदार क्र.१ यांनी अर्जास म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यांचे विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करणेत आला.

१०. अर्जदार यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षांच्या कथनांवरुन

खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या कारणांकरीता मांडत आहे –

| **अ.क्र** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ व २ हे जाबदार क्र.१ यांचेकडून प्रत्येकी दरमहा १७,०००/– इतकी अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| २. | अर्जदार हीस स्वतंत्र राहण्याची व्यवस्था अथवा घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

**– कारणमिमांसा–**

११. कौटुंबिक हिंसाचार महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करू शकेल या हेतुने केली आहे. प्रस्तुतचा कायदा हा स्त्रीयांच्या संरक्षणासाठी अस्तीत्वात आलेला आहे. अर्जदार जे जाबदार यांच्यावर आरोप करीत आहेत त्याबाबत पुरावा येणे अदयाप बाकी आहे. प्रस्तुतचा अंतरिम पोटगी मिळणेच्या अर्जाचा विचार करताना अर्जदार क्र.१ हिच्यावर जाबदार यांच्याकडून कौटूंबिक हिंसाचार झाला आहे ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली पाहिजे.

१२. प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार क्र. १ व जाबदार क्र. १ यांचा विवाह झाला असल्याबाबत व अर्जदार क्र.२ हा अर्जदार क्र.१ व जाबदार क्र.१ यांचा मुलगा असल्याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही. अर्जदार यांनी कौटुंबिक

घटना अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे. तसेच फे.नि.क्र.१४ अन्वये मौजे लिंब येथील मालमत्ता क्र.८४ ची कर आकारणीची मुळ प्रत, मौजे लिंब येथील गट क्र.७४, ४१४ चा ७/१२ उताऱ्याच्या छायांकित प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत –</u>**

१३. अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्व प्रथम अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, जाबदार क्र.२ हिने अर्जदार हिस लग्नामध्ये मानपान केला नाही, हुंडा दिला नाही म्हणून सतत पै–पाहुण्यांसमोर टोमणे मारत, भांडण काढत तसेच "तु मला पसंत नाही, माझ्या मुलाकडे बघून मी सून मानले आहे नाहीतर मी दुसरी मुलीशी लग्न लावून देणार होती. तु आल्या आल्या घरात आग लावलीस" असे वारंवार म्हणत होती. तसेच जाबदार क्र.१ हा दारु पिऊन अर्जदारास मारहाण करुन शिवीगाळ करीत. अर्जदार गरोदर असताना जाबदार हे अर्जदारास धमकावून भांडण काढीत असे. जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ व ३ यांचे सांगणेवरुन अर्जदारास मारहाण केली व अर्जदार यांचे गळयातील मंगळसुत्र स्वतःच्या हाताने तोडून दिले. तसेच अर्जदार यांना, "जातेस तर जा, मला तुझी गरज नाही, तुझ्या सारख्या छप्पन्न पोरी आणू अशी भाषा वापरून दि.०३/०४/२०२३ रोजी अर्जदार यांना जेवणातून मुंगी मारण्याचा खडू खायला घालून वरून पाणी पाजले. अर्जदार क्र.१ व ३ हे अर्जदार यांच्या चारीत्र्यावर संशय घेऊन मारहाण करीत असत. जाबदार क्र.२ यांनी अर्जदार यांच्यावर चोरीचा आळ घेतला. अशाप्रकारे जाबदार यांनी अर्जदार यांचा मानसिक व शारिरीक छळ केला आहे, जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना दि.१३/०६/२०२४ रोजी रू.५,००,०००/– हुंडा घेवून ये असे सांगून अंगावरील नेसत्या वस्त्रानिशी मुलगा श्लोक यांचेसह घरातून हाकलून दिले या बाबी कथन केल्या आहेत.

१४. अर्जदार हीने प्रस्तुत अर्जात संरक्षण अधिकारी यांचा कौटूंबीक घटना अहवाल नि.क्र.१० वर दाखल केला आहे. सदर अहवालावरुन व अर्जदार यांच्या

अर्जातील कथनांवरुन अर्जदारास शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रासास सामोरे जावे लागले हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अर्जदारने जाबदार यांच्यावर केलेले आरोप पाहता ते आरोप निश्चितच गंभीर स्वरुपाचे आहेत. कोणतीही स्त्री गंभीर कारण नसताना तिच्या लहान मुलासह तिच्या पतीपासून वेगळी राहते ही बाब संभाव्य वाटत नाही. प्रथमदर्शनी अर्जदार तिला होणा–या त्रासामुळे वेगळी राहत असल्याचे दिसुन येते. तसेच जाबदार यांनी त्यांना नोटीस बजावणी होवून देखील त्यांनी अर्जदाराच्या अर्जास म्हणणे दिले नाही. त्यामुळे अर्जदार हीचे अर्जातील कथने विनाआव्हानित राहिले आहेत. सबब अर्जदार हीचेवर कौटुंबिक हिंसाचार होत होता हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१५. अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे अर्थिक कमाईचे साधन नसेल तर जाबदार याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते.

१६. अर्जदार हीने तिच्या अर्जामध्ये ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. जाबदार यांनी देखील त्यास म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार ही कमावती नाही ही बाब प्रथम दर्शनी सिध्द होते.

१७. अर्जदार कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्याची जाबदार क्र. १ याची जबाबदारी असल्याने जाबदार क्र.१ कमावता आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, जाबदार क्र.१ व ३ यांचा गलाई व्यवसाय असून त्यापासून दरमहा १० ते २० लाख रूपये इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदारांची मौजे लिंब येथे बागायती जमीन मिळकत असून त्यामधून त्यांना वार्षीक ७ ते ८ लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचे घरी म्हैशी असून अशा दुभत्या जनावरांपासून दरमहा र.रू.३० हजार रूपये इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार क्र.१ व यांना एकत्रीत दरमहा र.रु.१७,०००/– इतकी अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

१८. अर्जदार हीने तिच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ फे.नि.क्र.१४ अन्वये मौजे लिंब

येथील मालमत्ता क्र.८४ ची कर आकारणीची मुळ प्रत, मौजे लिंब येथील गट क्र.७४, ४१४ चा ७/१२ उताऱ्याच्या छायांकित प्रती इत्यादी दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेले आहेत. त्यावरुन जाबदार निश्चीतच अर्जदार यांची जबाबदारी घेण्यास सक्षम असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

१९. जाबदार याचेकडे उत्पन्नाचे साधन असलेने अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही जाबदार क्र.१ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार जाबदार याचेकडून पोटगीची किती रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे बघणे आवश्यक ठरते. अर्जदार हीने तिच्या कथनांमध्ये जाबदार यांचा गलाई व्यवसाय आहे व त्यातून त्यांना दरमहा १० ते २० लाख रुपये मिळते. तसेच जाबदार यांच्या घरी दुभत्या म्हैशी असून त्यापासून त्यांना दरमहा ३० हजार इतके उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. परंतू अर्जदार हीने त्याकरीता कोणताही पुरावा दाखल केला नाही.

२०. अर्जदार या जाबदार यांचेपासून वेगळे राहिल्यापासून जाबदार क्र.१ याने अर्जदारास कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, परंतु पत्नी व मुलगा यांना सांभाळण्याची नैतिक जबाबदारी ही जाबदार याची आहे. त्यामूळे उपरोक्त सर्वबाबी विचारात घेता अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरिता जाबदार याने अर्जदार क्र.१ व २ यांना एकत्रीत दरमहा र.रु.६,०००/– देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता –</u>**

२१. अर्जदार हीने अशी विनंती केली आहे की, जाबदार कडून तिला दरमहा घरभाड्याची रक्कम रु.५,०००/– मिळावी. परंतू अर्जदार ही भाड्याने राहत असल्याबाबत अर्जात कोणतेही कथन नाही. याउलट ती तिच्या माहेरी राहते व तिला स्वतंत्र भाड्याने राहण्याची आवश्यकता आहे याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे अर्जदार कथन करत असलेली मागणी मान्य करता येणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

१. अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

२. जाबदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ व २ यांना एकत्रीत दरमहा रक्कम ६,०००/– (अक्षरी रुपये सहा हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावेत.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा.

४. अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसुन आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

६. आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार क्र. १ यांना मोफत देण्यात यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.07.16 17:59:35 +0530

स्थळ – विटा
दि.१६.०७.२०२६

**(श्रीमती व्ही.डी.शिरसे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

Name of Stenographer :- G.U.Varude
Name of the Court :- Smt. V.D.Shirse
Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.
Vita. Tal:-Khanapur.
Date of decision :- 16.07.2026
Order signed by P.O. on :- 16.07.2026
Order uploaded on :- 16.07.2026